# एकविसाव्या शतकातील कादंबरी विश्व

**डॉ. सौ. शुभांगी परांजपे**
*आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय*
*नागपूर*

कथा असो वा कादंबरी जीवनानुभव त्यातून व्यक्त व्हायलाच पाहिजे. मानवी जीवनातील नीती, मूल्ये, रुढी, परंपरा यांना साहित्यात स्थान मिळायलाच पाहिजे. आजवर ते मिळत गेले आहे. संघटित माणसांच जग म्हणजे समाज. समाजातील माणसांच कथाविश्व साकार करणे हे एक कौशल्यच आहे.

कादंबरी हा वाड्.मय प्रकारच असा आहे की ज्याचा अनेक दिशांनी अभ्यास करता येतो. अनेक शतकांची परंपरा कादंबरी वाड्.मयाला लाभली आहे. भरपूर लांबी कादंबरी या प्रकारालार लाभले आहे. मानवी जीवनाचा तो आरसा असतो. व्यक्तीच्या मनाचे, बुद्धीचे, आयुष्याचे परिमाण कादंबरीला लाभली आहेत. मराठीतील पहिली कादंबरी कोणती? यमुनापर्यटन, मुक्तमाला, की मोचनगड असा वाद निर्माण होतो? तो त्यांच्या संदर्भातील विचारांच्या तफावतीमुळेच!

कोणतीही कादंबरी स्वयंभू असू शकत नाही, ती घडवावी लागते. 'व्यक्ती' ही कादंबरीच्या रचनेची एक महत्वाचा घटक आहे. 'वातावरण' हा घटकही महत्वाचा असतो. कादंबरीमध्ये कार्यकारणभाव असणे आवश्यक असते. कादंबरीचे स्वरुप घटनाप्रधान असते. 'यमुनापर्यटन'चे लेखक बाबा पद्मनजी यांनी कादंबरी तंत्राचा व्यवस्थित विचार केलेला आहे. मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून तिचा उल्लेख करणे उचित होय. मराठी कादंबरीत बाबा पद्मनजी वास्तववादाचा उगम म्हणून ओळखले जातात. हिंदू धर्मात सुधारणा व्हावी आणि विधवा–विवाह रूढ व्हावेत यात बाबांना फारसा रस नव्हता. 'यमुनापर्यटन' ही एक बोधवादी कादंबरी आहे. 'यमुनापर्यटन' नंतर 'मुक्तमाला' ही कादंबरी प्रकाशित झाली. गुंजीकरांची 'मोचनगड'चा ही उल्लेख क्रमप्राप्त ठरतो. हरिभाऊ आपटे यांची 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरी उल्लेखनीयच आहे. त्यांची शैली साधी,सरळ,सुबोध व प्रवाही आहे. हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीच्या रूपाने मराठी कादंबरी रंजनाकडून, बोधाकडून आणि वर्णनात्मकतेकडून वेगळी झाली आहे. दर्शनाकडे, स्वाभाविकाकडे आणि प्रतीतीकडे ती सरकली. मराठी कादंबरीला एक सुंदर, सुशोभित दालन प्राप्त झाले. हरिभाऊंनंतर दुसरा टप्पा वामन मल्हार जोशी यांचा येतो. डॉ. केतकर यांची कादंबरी सुधारणावादाच्या मार्गावर कालक्रमण करणारी आहे. केतकरांची शैली साधी आणि रसाळ आहे. तिला हळवेपणा, संकोच किंवा सूचकता यांचा स्पर्श झालेला नाही. उलट ती वावदूक शैली आहे. 'ब्राह्मणकन्या' ही केतकरांची उत्कृष्ट कादंबरी आहे. प्रा. ना.सी.फडके यांच्या कादंबरीने झटकन सामाजिक रूप स्वीकारलेले आहे. रसिक वाचकांचे रंजन हे त्यांचे ध्येय होते. फडक्यांप्रमाणे खांडेकरांचे कथानक रेखीव नसते. वि. स.खांडेकरांची कादंबरी प्रतीकात्मक आहे. यानंतर नामोल्लेख करावा लागतो ग.त्र्यं.माडखोलकर यांचा! त्यांची 'कांता' ही कादंबरी अप्रतिम आहे. द्वितीय महायुद्धाचा परिणाम कादंबरीविश्वावर झालेला आहे. हरिभाऊ ते पेंडसे यांचा पूल सांभाळण्याचे प्रयत्न पु.य.देशपांडे यांना जाते. विभावरी शिरूरकर यांची कादंबरी वास्तवाला अधिक जवळ करणारी आहे. विश्राम बेडेकरांची 'रणांगण' उल्लेखनीय आहे. 1945 नंतर साहित्यात असमाधान प्रकर्षाने प्रकट झाले. पेंडश्यांची 'गारंबीचा बापू' उल्लेखनीयच! कोसला, चक्र ही उल्लेखनीयच! खानोलकरांचा उल्लेख ही इथे आवश्यक ठरतो.

मराठी कादंबरीत अनेक परिवर्तन झालीत. तिच्या जिवंतपणाचे व सर्वस्पर्शी स्वरूपाचे ते द्योतक आहे. डॉ. किशोर सानपांनी यावर सविस्तर प्रकाश टाकला आहे. कादंबरीची संकल्पना व स्वरूप सविस्तर मांडताना आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ ते भालचंद्र नेमाडे यांचे उदाहरण देतात. कादंबरीचे स्वरूप व्यक्त करताना भालचंद्र नेमाडे म्हणातात, ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडें जास्त झुकलेले आहे अशी साहित्यकृती असते.''[1]

या युगाला कादंबरीचे युग संबोधिले तरी चालू शकेल. कादंबरी हा विस्तारशील व सर्जनशील प्रकार आहे. भालचंद्र नेमाडेंची कादंबरीची संकल्पना समाजसापेक्ष आहे. सर्वच कादंबरीकारांवर प्रकाश टाकणे शक्य होणार नाही. कुणा एका कादंबरीकारावर बोलणे, लिहिणे म्हणजे इतरांवर अन्याय करणेच होय.

इ.स. 1990 नंतरच्या भारतीय समाजात आमुलाग्र असे बदल होत गेले. त्यातूनच मराठी कादंबरी विश्वाला नवे विषय मिळाले. अभिजात साहित्य व प्रादेशिक साहित्य यातूनच अस्तित्वात आले. भाषा म्हटली की तिला दोन स्तर असतातच. एक प्रमाण भाषा व दुसरी बोली भाषा! मराठी कादंबरीला सजविण्याचे कार्य दोघांनीही केले. यामुळेच मराठी कादंबरी विविधतेने नटलेली आहे. बदलते तंत्रज्ञान, बदलती संस्कृती साहित्यावर नेहमीच परिणाम करीत असते. सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक आणि इतरही प्रश्नांचा मागोवा साहित्य घेत असते.

इ.स.2000 नंतरच्या कादंबऱ्यांमध्ये सामाजिक व पर्यावरणातील बदल लक्षात येतो. भारताने गॅट करारावर सही करून मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. 'जागतिकीकरण' ही अर्थशास्त्रातील संकल्पना असली तरीही समाजाच्या सर्वच स्तरावर, सर्वच क्षेत्रात तिचा व्यापक परिणाम झालेला नजरेस पडतो. भौतिक सुखाच्या कल्पना बदलत गेल्या. कामाच्या निमित्ताने स्त्रियांना व

पुरूषांना घराबाहेर जास्त वेळ राहावे लागते. पती, पत्नीशिवाय अन्य स्त्री–पुरुषांशी जास्त सहवास घडतो. घरातील व्यक्तींपेक्षा कुणीतरी ऑफिसमधील व्यक्ती आपली जास्त काळजी घेते ही भावना मानवी मनाला सुखावून जाते. आणि मग घरात संघर्षाचे बीज पेरले जाते. धुसपूस, नाराजी, चिडणे, परस्परांचा अपमान करणे इत्यादी गोष्टी परिपक्वतेच्या अभावी घडून येतात. बऱ्याच वेळा पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्रियांचा कोंडमारा होतो. सन 2000 नंतर विवाह संस्थेत तसेच कुटुंब संस्थेतही बरेच बदल घडून आलेत. संयुक्त कुटुंब पद्धती आज कमी घरांमध्ये दिसून येते. विभक्त कुटुंबांची संख्या जास्त झालेली आहे. शकुंतला खोत, इंद्रायणी जोग, कमलाताई सोहनी इ. स्त्री कादंबरीकारांनी आपल्या भावविश्वाला मोकळी वाट करून दिली. विदर्भातील ग्रामीण कादंबरीकार प्रतिमा इंगोले यांच्या बुढाई (1999) चा नामोल्लेख करणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात भेगाळलेल्या जमिनीला पावसाळ्यात पाण्याच्या थेंबांनी न्हाऊ घातले जाते. त्यामुळे जमीन नरम होऊन फुगून वर येते. यालाच लेखिका 'बुढाई' असे संबोधिते. ग्रामीण महिलांच्या समस्या मांडण्याचा प्रतिमा इंगोलेंनी प्रयत्न केला.

प्रतिभा रानडे यांची 'रेघोट्या' ही अगदी वेगळ्या विषयावरील कलात्मक कादंबरी आहे. या कादंबरीतील 'निर्मला' या स्त्री पात्राला जीवनविषयक अनेक प्रश्नांना कसे सामोरे जावे लागते आणि तिचा जीवघेणा संघर्ष यात चित्रीत झालेला आहे. पती–पत्नी नात्यात येणाऱ्या दुराव्याला निर्मलाच्या पतीची अतृप्त लैंगीक कामना हे कारण ठरते. या दोघांच्या मनाचा वेध चांगल्या पद्धतीने घेतला गेला आहे. सन 2000 मध्ये प्रकाशित झालेली आशा बगे यांच्या 'सेतू' त्यानंतरची भूमी (2004), भूमिका आणि उत्सव (2011), मुद्रा आणि चरित्रात्मक 'चक्रवर्ती' या कादंबऱ्यांतून आशा बगे यांनी मानवी जीवनाचे सखोल चिंतन केले आहे. बंडखोर भूमिका आपल्या कथात्म साहित्यातून मांडणाऱ्या गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे, कविता महाजन, अरूणा सबाने, शांता गोखले, अंबिका सरकार, छाया महाजन, शैलजा वाडीकर इत्यादी स्त्री लेखकांनी स्त्री–मुक्तीचा नवीन विचार आपल्या कादंबऱ्यांतून मांडलेला दिसून येतो. मेघना पेठे यांना समकालीन असणाऱ्या कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी 2005 मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीवर 'बाईमाणूस' हा चित्रपटसुद्धा निघाला. कविता महाजन यांची 'भिन्न' ही 2007 मधील प्रकाशित कादंबरी. ही कादंबरी महिलांच्या लैंगिक आणि सामाजिक उपेक्षेचे प्रश्न हाताळणारी आहे. अरूणा सबाने यांची 'विमुक्ता' 2006 मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी जीवनसंघर्षात खचलेल्या स्त्री मनांना निश्चितपणे आधार वाटावी अशी नायिकप्रधान कादंबरी आहे. अरूणा सबाने यांची 'मुन्नी' (2010) ही वेश्यांच्या जीवनावर आधारित असणारी आजची वास्तववादी व समस्याप्रधान कादंबरी आहे. इ.स.2000 साली सुमती इनामदार यांची 'अश्वत्थामा' नावाची कादंबरी प्रकाशित झाली. अश्वत्थाम्याला आपल्या पित्याला द्रोणाचार्यांना कपटाने मारणाऱ्या पांडवांचा राग येतो. अपमानाने बेभान होऊन भारतीय युद्धानंतर पांडवांची सर्व मूले तो झोपेतच कापून काढतो. पांडवांचा निर्वंश करतो. सुशील खेडकर यांची 'शापिता' ही कादंबरी पेशवेकाळातील आनंदीबाईंवर कसे अन्याय झाले. तिला कसे बदनाम केले गेले याचे इतिहासकालिन नव्याने विचार करायला लावणारे आनंदीबाईंचे जीवन आलेले आहे. दास मोरे यांची 'घोगरवाडी' व शकील शेख यांची 'जुवा' या कादंबऱ्याही प्रकाशित झालेल्या आहेत.

भारतातील अंध आणि अपंगांची संख्या दोन कोटींपेक्षा अधिक असेल. एक शारीरिक अपंगता सोडली तर हे लोक साधारण माणसांसारखेच असतात. त्यांच्या सामाजिक, शारीरिक आणि मानसिक गरजा इतरांसारख्याच असतात. अंध व अपंगांच्या समस्यांविषयी फारसा विचार करत नाही. परिणामतः अंध आणि अपंग न्यूनगंड व विकृतीच्या कोषात गुरफटले जातात. त्यांचे स्वतःचे असे वेगळे जग तयार होते. 'आंधळी कोशींबीर' ही भालचंद्र देशपांडे यांची कादंबरी उपेक्षित लोकांच्या आयुष्यात डोकावण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी मनोव्यापारांचे सूक्ष्म निरीक्षण, ओघवती निवेदनशैली, आशयघन कथेमुळे ही कादंबरी वाचनीच तसेच उद्‌बोधक झाली आहे.

पूर्वीच्या काळी केस धुण्यासाठी रिठे पावडर वापरली जाई. आता मात्र शाम्पू वापरल्या जातो. चुली, स्टोव्ह जाऊन इलेक्ट्रिक शेगडी, गॅस व गिझर सुद्धा आलेत. 1950 नंतर कुटीर उद्योग बंद पडले, 1970 नंतर लघुउद्योग बंद पडायला लागले. 1990 नंतर कोटीपर्यंत भांडवल असणाऱ्या कंपन्याही बंद पडायला लागल्या. संशोधनाने घेतलेली झोप माणसाच्या बुद्धीसामर्थ्याच्या बाहेर गेलेली असून शेतावर काम करणारा मजूर कॉम्प्युटर वर बसून ट्रॅक्टरला बिनामाणसाचा शेतभर फिरवतो आहे.

राजन खान यांनी 'वळूबनातील कामधेनू' ही कादंबरी लिहिली आहे. 'थेंब थेंब मृत्यू' ही एडस् या भयावह रोगावरील कादंबरी 2001 साली प्रकाशित झाली. शेषराव मोहिते यांची 'धूळपेरणी' ही कादंबरी 2001 साली प्रकाशित झाली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनावरील ही कादंबरी आहे. 'उत्तरायण' ही रविंद्र शोभणे यांची कादंबरी आर्य–अनार्य बाबींवर इ.स.2000 साली राजकारण्यानी उपस्थित केलेल्या वादाचे फलित आहे. इ.स.2002 साली प्रकाशित झालेली सुरेश द्वादशीवर यांची 'वर्तमान' ही कादंबरी राजकारणासाठी जाती, धर्म, पंथ, झेंडे, मंदिरे यांचा वापर करावा लागतो, या 2000 सालातील विचारांचे फलित आहे. विदर्भातील प्रामुख्याने बुलढाणा जिल्ह्यातील पाणी समस्येवर सदानंद देशमुख ह्यांनी 'बारोमास'ही कादंबरी लिहिली आहे. या शतकात दलितांचे अनेक पुढारी भारतीय राजकारणात आले त्यामुळे दलित जनतेच्या आशा–आकांक्षा उंचावल्या.

वळूबनातील कामधेनू' राजन खान यांची ही कादंबरी 15 ऑगस्ट 2001 रोजी प्रकाशित झाली. या कादंबरीतून नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मनोव्यथेला लेखकाने उघड केले आहे. 'थेंब थेंब मृत्यू' संजय सोनवणी यांची ही कादंबरी 15 ऑगस्ट 2001 रोजी प्रकाशित झाली. ही एडस् या रोगावर व त्याच्या प्रादुर्भावर प्रकाश टाकणारी मराठी

साहित्यातील पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीतील डॉ साने हे स्वतः डॉक्टर असून एडस् रोगावर संशोधन करण्यात गुंतलेले आहेत. एडस् रोगाचा संबंध लैंगिक कारणाशी आहे व या रोगाने अमेरिका हादरुन गेली आहे. हे कथानक या कादंबरीत आलेले आहे.

या नंतर विचार करू 'धुळपेरणी' या शेषराव मोहिते यांच्या 2001 च्या कादंबरीचा. गोपाळ मास्तर त्याच्या भावाच्या पोराला श्रीरामला पुष्कळ शिकवतो. परंतु येथेही शाखा चुकल्यामुळे बापाच्या नशिबी आलेला शेतीचाच व्यवसाय श्रीराम करू पाहतो. पुढे या शाखेचे ज्ञान घेऊनही बेकारच राहतो आहे शेवटी शेती व नातलगांकडून, आप्त स्वकीयांकडूनही तुटून जातो. अशी त्यांच्या जीवनाची शोकांतिका होते. कृषी पदवी व पदव्युत्तर मुलांचे हे आजचे वास्तव तात्काळपणे मोहिते यांनी धूळपेरणीत रेखाटन केलेले असून श्रीरामच्या मनातील धूळपेरणी कशी उद्ध्वस्त झाली, याचे चित्र त्यांनी वाचकांसमोर ठेवले आहे.

'ऐसे कुणबी भूपाळ' ही भारत काळे यांची 2001 मधील कादंबरी आहे. या कादंबरीतून भारतीय एकत्र कुटूंब व्यवस्थेच्याचं सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक ऱ्हासपर्वाची कहाणी आलेली असून कुणब्यांच्या घराण्यातील प्रेम, जिव्हाळा, दया, करुणा, सात्विकता, माणूसकी, नातेसंबंध, प्रामाणिकपणा, कष्टार्जन व कुटूंबाविषयीची ओढ दर्शविणारी ही कादंबरी आहे.

'उत्तरायण' ही रविंद्र शोभणे यांची 2001 मधील कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीतून महाभारतातील व्यक्तिरेखांना मानवी पातळीवर उभे करून महाभारत हा एक इतिहास आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. 'चेडा' ही सुखदेव ढाणके यांची 2001मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. एका कविचे हळवे मन आणि त्याच्या हळव्या दुसऱ्या संवेदना व्यक्त झालेल्या आहेत. दलित समाजात जन्मलेला हा नायक आहे. दलित कादंबरीतील आजवर जाणविलेला आक्रळस्तावेषणा यात नाही. सुरेख वैचारिक वैचारिक विण यात विणलेली आहे. 'सेलझाडा' ही नामदेव कांबळे लिखित, 2001 मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी एकीकडे पुत्र न होण्याचे दुःख तर दुसरीकडे बलुतेदारीच्या घटना परंपरेबद्दलचे दुःख लेखकाने उभे केलेले आहे. साठोत्तरी कालखंडात आपल्या परंपरेविषयीची आस्था असण्याच्या जाणिवेतून दलित, ग्रामीण, उपेक्षित जीवनावर ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत त्यातून बलुतेदारीची प्रथा हळूहळू ग्रामीण जीवनातून निघून गेली हे वास्तव रेखटण्यात आलेले आहे. 'तंट्या' ही बाबा भांड यांची कांदबरी 2001 मध्ये प्रकाशित झाली. 'तंट्या' ह्या भिल्ल तरुणाची कथा यात आलेली आहे. हा सच्चा क्रांतिकारी होता. जीवनाची विविध रुपे पाहणारा, जंगलाच्या सानिध्यात धन्यता मानणारा तसेच धनिकांचे धन लुटून गरिबांना वाटणारा तरुण होता. त्याचा हा जीवनप्रवास दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 'वर्तमान' ही सुरेख व्दादशीवार यांची कादंबरी 2002 मध्ये प्रकाशित झाली. 2000 ते 2002 हा दोन वर्षाचा कालखंड आणि त्यात घडलेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक घटना आणि त्यांचा सामान्य जणांच्या मनावर झालेला परिणाम तसेच पत्रकाराने या घटनांची लावलेली एक संगती यात आलेली आहे.

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची कादंबरी 2002 मध्ये प्रकाशित झाली. आजच्या शेतीयुगाशी निगडीत असलेल्या शेतकऱ्यांची आणि खुद्द शेतीची ही करुण शोकांतिका आलेली आहे. 'पार्टटाईम' ही प्रतिमा इंगोले यांची 2002 ची कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीतून नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याला येणारा मानसिक व शारिरीक छळ तसेच या स्त्रियांकडे पाहण्याची पुरुषांची विकृत दृष्टी लेखिकेने स्वानुभवाने मांडलेली आहे. विचारांना नैतिक उंचीही आहे. स्त्री म्हणून समाजात जगत असतानाच स्वतःला सुरक्षित ठेवावेच लागते. या सर्व कसरतीत अनुराधा आपले स्त्रीत्व कधीच गमावत नाही. 'खूप लोक आहेत' ही शाम मनोहर यांची 2002ची कादंबरी आहे. या कादंबरीतून जीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणती संशोधन पद्धती असावी व तिचे स्वरूप कसे असावे या प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. 'अभिसरण' ही जी.के.रेणापुरे यांची 2002मधील कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीचा विषय एका सामाजिक अंगाचा असून दलित समाजाकडील अभिसरणाची प्रक्रिया पूर्णपणे थांबलेली आहे. या विषयालाच लेखकाने हात घातला आहे. आज कार्यकर्ते आणि पुढारी होण्याचं अभिसरण पूर्णपणे थांबल्यासारखंच आहे. आम्हीच कार्यकर्ते, आम्हीच पुढारी असं काहीतरी आज सुरू आहे. यामुळे आमचं समाजकारण, राजकारण, अर्थकारण सगळं काही बदलल्या गेलं आहे? याचं वास्तवचित्र या कादंबरीत आलेलं आहे.

'गाथा सप्तशती' ही राजेंद्र मालोसे यांची कादंबरी 2002 मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीतून परंपरा जपणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचार व त्यांचे संस्कार यातून कायद्याची होणारी कोंडी दर्शित होते. भारतीय पुरूषप्रधान समाजाचे कालचे आणि आजचेही वास्तव व्यक्त करीत आहे. उजरी, लोपा, तिल्ली यांच्या जीवनदर्शनाने वाचक हादरून जातो. इ.स.2000 सालापासून महिला सबलीकरणाचे वारे पूर्ण हिंदूस्थानभर जोर धरू लागले याचा उहापोह या कादंबरीत केला आहे.

'अंतःपुरुष' ही बाबू बिरादार यांची कादंबरी `2002 रोजी प्रकाशित झाली. 'जातवान' ही राजन खान यांची कादंबरी 2003 साली प्रकाशित झालेंली आहे. 'कोहम्' ही सुरेश द्वादशीवार यांची कादंबरी 2003 मध्ये प्रकाशित झालेली आहे. 'विनशन' ही राजन खान यांची कादंबरी 2003 रोजी प्रकाशित झाली. 'वारूळ' ही बाबाराव मुसळे यांची कादंबरी 2004 साली प्रकाशित झाली. 'स्लामी ड्रॅगन' (ओसामा बिन लादेन) ही गुरूनाथ नाईक ह्यांची कादंबरी 2004 साली प्रकाशित झाली. 'कळी अजून फुलली नव्हती' ही नारायण सदावर्ते यांची कादंबरी 2004 साली प्रकाशित झाली. 'संभाजी' ही विश्वास पाटील यांची कादंबरी 2005 मध्ये प्रकाशित झाली. 'चक्रीवादळ' ही प्रभाकर पेंढारकर यांची कादंबरी 2005 मध्ये प्रकाशित झाली. आंध्रप्रदेशाच्या सागर किनाऱ्यावरील मछलीपट्टम, गुंटूर या ठिकाणी चक्रीवादळ होऊन रौद्ररूप मानवाला दाखविले याचे वर्णन या कादंबरीत आहे. 'निष्कलंक' ही बाबा कदम यांची

कादंबरी असून 2005 मध्ये ती प्रकाशित झाली. लक्ष्मण गायकवाडांची 'दुभंग', आनंद यादवांची 'लोकसखा ज्ञानेश्वर', मेघना पेठे यांची 'नातिचरामी', कविता महाजनांची 'ब्र', बाबाराव मुसळे यांची :पाटीलकी', अशोक कुलकर्णींची 'चेअरमन', गिरीश प्रभुणे यांची 'पारधी', अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' 2006 मध्ये प्रकाशित झाली. 'प्रताप' ही बाबा कदम यांची कादंबरी 15 एप्रिल 2006 रोजी प्रकाशित झाली. 'तिसरी क्रांती' 2005 ही द्वारकानाथ लेले यांची कादंबरी उल्लेखनीय आहे. 'सात बारा ते तीन तेरा' ही राजीव ठकार यांची कादंबरी 2007 साली प्रकाशित झाली. 'पुत्र सागराचा' ही रोहिणी झेंडे यांची कादंबरी 2007 मध्ये प्रकाशित झाली.

जागतिकीकरण, उदारीकरण, धर्म आणि धर्मांधता, जातीयवाद आणि वंशवाद, दहशतवाद, मूल्यऱ्हास अशा जीवघेण्या प्रश्नांनी भारतीयांना एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरच ग्रासून टाकले आहे. परिवर्तनाच्या नोंदी समकालीन कादंबरीतून दृष्टिगोचर व्हायलाच हव्या हे इथे जाणवते. या काळाचे प्रतिबिंब वरील सर्व कादंबऱ्यांमध्ये जाणवते. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्हींच्या दृष्टीने मराठी कादंबरीचे स्वरूप बदलत गेले.

**संदर्भ :**

1. *भालचंद्र नेमाडे, 'टीका स्वयंवर', साकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती, पृ.198*
2. *धार आणि काठ, नरहर कुरुंदकर*
3. *अक्षरयात्रा 2020–21, संपादक डॉ.दादा गोरे*
4. *आंधळी कोशिंबीर, भालचंद्र देशपांडे*
5. *स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, डॉ.शंकर विभूत*